महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,
१९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश
बृहन्मुंबई क्षेत्राची सुधारित प्रारुप विकास योजना
२०१४-२०३४

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक :- विसप्रस्ताव २०१५/९७४७/५६/नवि-११**
**मंत्रालय, मुंबई :४०० ०३२.**
**दिनांक — २३ एप्रिल २०१५.**

### आदेश

बृहन्मुंबई क्षेत्राची प्रारुप सुधारित विकास योजना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) खाली दिनांक २५.२.२०१५ रोजी नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणेसाठी शासन राजपत्रात प्रसिध्द करणेत आलेली आहे. सदर प्रारुप विकास योजना प्रसिध्द झालेनंतर सदर विकास योजनेस समाजाच्या सर्व स्तरातून प्रखर विरोध झालेला आहे. जवळपास २५,००० सूचना/ हरकती सदर प्रारुप विकास योजनेवर बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत. सन २०१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये (प्रथम अधिवेशन) विधीमंडळामध्ये महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई क्षेत्राच्या प्रसिध्द सुधारित प्रारुप विकास योजनेबर चर्चा झालेली असून मा. मुख्यमंत्री महोदय यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य; प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची समिती नेमून बृहन्मुंबई क्षेत्राच्या प्रसिध्द सुधारित प्रारुप विकास योजनेसंदर्भात अहवाल सादर करणेबाबत दिनांक ६.४.२०१५ रोजी विधीमंडळामध्ये निवेदन केलेले आहे.

मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करणेत आलेल्या समितीने त्यांचा अंतिम अहवाल शासनास सादर केलेला आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २५ खाली तयार केलेल्या विद्यमान जमीन वापर नकाशात तसेच प्रारुप सुधारित विकास आराखडयामध्ये आरेखनाच्या चुकांसहीत इतरही चुका मोठया प्रमाणावर झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे खारफुटीच्या जमीनीवर रहिवास वापराचे नियोजन दर्शविणे, ना विकास क्षेत्र मोठया प्रमाणावर कमी करणे, विकास परवानगी दिलेल्या ठिकाणी आरक्षणांचे नियोजन दर्शविणे, म्हाडास गिरणी कामगारांच्या गृहनिर्माणासाठी प्राप्त झालेल्या क्षेत्रावरही आरक्षणे दर्शविणे, तसेच एकंदरीत नियमानुसार जिथे विकास शक्य नाही तसेच विविध कायदेशीर बंधनामुळे विकास करता येणार नाही, अशा ठिकाणी विकास प्रस्तावांचे नियोजन करणे इत्यादी बाबी समितीच्या निदर्शनास आलेल्या आहेत. यास्तव समितीने, बृहन्मुंबई महागनरपालिकेने चुकांची सखोल शहानिशा करुन सगळया चुकांची जागेवरील परिस्थितीनुसार, गुणवत्तेनुसार, नियोजनाचे दृष्टीने व कायदेशीर बाबी तपासून दुरुस्ती करुन प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये महासभेच्या पूर्वमान्यतेने पुनर्प्रसिध्द करणे उचित होईल असे मत व्यक्त केलेले असून त्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ खाली शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस निदेश द्यावेत अशी शिफारस शासनास केलेली आहे

प्रारुप विकास योजनेच्या प्राथमिक टप्प्यामध्ये मोठया प्रमाणावर मूलभूत चुका झालेल्या असल्याने त्या प्राथमिक टप्प्यामध्ये दुरुस्त करणे आवश्यक आहे. सदर बाबी तसेच समितीची शिफारस विचारात घेता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील विकास योजनेच्या प्रकरण तीन च्या तरतूदींची अंमलबजावणी सुयोग्यपध्दतीने व कार्यक्षमतेने होण्याकरिता सदर अधिनियमाच्या कलम १५४ खाली नियोजन प्राधिकरणास निदेश देणेच्या शक्ती शासनाने वापरणे आवश्यक आहे. असे शासनाचे मत झालेले आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४(१) अन्वये खालील प्रमाणे निदेश देणेत येत आहेत.

## निदेश

" बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २५.२.२०१५ रोजी शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या प्रारुप विकास योजनेमधील चुकांची सखोल शहानिशा करुन सगळया चुकांची जागेवरील परिस्थितीनुसार, गुणवत्तेनुसार, नियोजनाचे दृष्टीने व कायदेशीर बाबी तपासून त्यानुरुप दुरुस्ती करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील प्रकरण तीन च्या तरतूदींचे पालन करुन प्रारुप विकास योजना कलम २६ अन्वये महासभेच्या पूर्वमान्यतेने चार महिन्याचे मुदतीमध्ये नागरिकांच्या सूचना/हरकतीसाठी पुनर्प्रसिध्द करावी."

वरील निदेश या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

(संजय बाणाईत)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत :- आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
प्रत माहितीसाठी

१) मा.मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव
२) मा.राज्यमंत्री(नगरविकास) यांचे स्वीय सहाय्यक
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,मुंबई.
४) सहसचिव तथा संचालक,नगर रचना, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग ( त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णय विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.)